# 'उज्जीवन'ची प्रत्येकी २०७-२१० रुपयांनी पुढील आठवड्यात भागविक्री

व्यापार प्रतिनिधी, मुंबई



**बंगळुरूस्थित बचतगट** जाळ्यावर आधारित सूक्ष्म वित्तसाहाय्य संस्था उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस लि.ने भांडवली बाजारात खुल्या प्रारंभिक भागविक्रीच्या माध्यमातून ८८२ कोटी रुपये उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रति समभाग २०७ ते २१० रुपये या किंमतपट्ट्यात ही भागविक्री २८ एप्रिलला सुरू होऊन २ मे रोजी समाप्त होईल.

रिझर्व्ह बँकेने गतवर्षी उज्जीवनला लघु वित्त बँक (स्मॉल फायनान्स) म्हणून तत्त्वतः मंजुरी दिली आहे. या संक्रमणासाठी रिझर्व्ह बँकेची महत्त्वाची अट म्हणजे कंपनीच्या विद्यमान भागभांडवलात विदेशी भांडवलाचे प्रमाण ४९ टक्क्यांखाली आणणे भाग ठरणार आहे. प्रस्तावित भागविक्रीच्या माध्यमातून उज्जीवनमधील विदेशी गुंतवणूकदारांकडील २.४९ कोटी समभागांचीही विक्री करून त्यांचा कंपनीतील विद्यमान ७७ टक्के हिस्सा हा ४४-४५ टक्क्यांपर्यंत सौम्य होणार आहे.

गत आठ वर्षांपासून कार्यरत उज्जीवन वार्षिक सरासरी ५१.३ टक्के वृद्धिदराने आपल्या मालमत्ता डिसेंबर २०१५ अखेर ४,६०० कोटी रुपयांवर नेली आहे, तर याच काळात निव्वळ नफ्यात वार्षिक सरासरी जवळपास ६० टक्के दराने प्रगती साधली आहे. एप्रिल २०१७ पर्यंत स्मॉल फायनान्स बँकेत रूपांतरणानंतरही कंपनी जवळपास याच विकासदराने प्रगती साधत राहील, असा विश्वास उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेसचे संस्थापक व्यवस्थापकीय संचालक व मुख्याधिकारी समित घोष यांनी व्यक्त केला.

कोटक इन्व्हेस्टमेंट बँकिंग, अ‍ॅक्सिस कॅपिटल, आयसीआयसीआय सिक्युरिटीज आणि आयआयएफएल यांच्याकडून व्यवस्थापन पाहिल्या जात असलेल्या या भागविक्रीत छोट्या व्यक्तिगत गुंतवणूकदारांना किमान ७० समभागांसाठी आणि त्यापुढे ७०च्या पटीत समभागांसाठी खरेदी अर्ज करून सहभागी होता येईल. भागविक्रीपश्चात कंपनीचे समभाग बीएसई आणि एनएसई या शेअर बाजारात सूचिबद्ध होतील.